आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११  मार्च २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- नागरिकत्व सुधारणा कायदा लागू करणारी अधिसूचना केंद्र सरकारकडून जारी
- देशातल्या ११२ महामार्ग प्रकल्पांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण आणि भूमीपूजन
- अग्नी- पाच या आंतरखंडीय क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीबद्दल राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, आणि प्रधानमंत्र्यांकडून डीआरडीओचं अभिनंदन
- निवडणूक रोखे विक्रीची माहिती उद्यापर्यंत निवडणूक आयोगाला देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे स्टेट बँक ऑफ इंडियाला निर्देश

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात मुंबईची विदर्भावर २६० धावांची आघाडी

<><><><><>

नागरिकत्व सुधारणा कायदा देशात लागू करणारी अधिसूचना केंद्र सरकारनं आज जारी केली. डिसेंबर २०१९ मधे हा कायदा संसदेत मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर राष्ट्रपतींनी त्याला मान्यता दिली होती. या कायद्यानुसार अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश या देशांमधून आलेल्या अल्पसंख्याक शरणार्थींना भारताचं नागरिकत्व मिळू शकेल.

या देशांमधून आलेले हिंदू, शीख, बौद्ध, जैन, ख्रिस्ती, आणि पारशी धर्मीय स्थलांतरित या कायद्याअंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज करु शकतात. ही अर्जप्रक्रिया

पूर्णपणे ऑनलाईन असून, त्यासाठी एक वेब पोर्टल उपलब्ध करुन दिलं असल्याचं केंद्रिय गृह मंत्रालयाच्या प्रवक्त्यानं सांगितलं.

<><><><><>

पायाभूत क्षेत्रातला वेगवान विकासच देशाच्या अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या क्रमांकावर घेऊन जाईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. देशातल्या ११२ महामार्ग प्रकल्पांचं लोकार्पण आणि भूमीपूजन आज हरियाणात गुरुग्राम इथं आयोजित कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीनं केल्यानंतर ते बोलत होते. गेल्या ३ महिन्यात १० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या रस्ते प्रकल्पांचं लोकार्पण आणि भूमीपूजन झालं असल्याचं त्यांनी सांगितलं. पायाभूत सुविधा प्रकल्प वेळच्या वेळी पूर्ण करुन या क्षेत्राचा विकास करण्याप्रति सरकार वचनबद्ध आहे, असं ते म्हणाले.

आठपदरी द्वारका एक्सप्रेस वे च्या हरियाणातल्या १९ किलोमीटर लांबीच्या पट्ट्याचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं.

<><><><><>

मालवाहतुकीसाठी समर्पित दोन महामार्गांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्या होणार आहे. समर्पित मालवाहतूक रस्ते महामंडळाचे संचालक शोभित भटनागर यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यात गुजरातमधे मकरापूर इथून महाराष्ट्रात घोलवडपर्यंत येणाऱ्या रस्त्याचा समावेश आहे.

<><><><><>

मिशन दिव्यास्त्र अंतर्गत अग्नी- पाच या आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी केल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात

दिली आहे. स्वदेश निर्मित क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी केल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी डीआरडीओच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन केलं आहे.

राष्ट्रपती दौपदी मुर्मु आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या यशाबद्दल डीआरडीओच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन केलं आहे. खगोल धोरणात महत्वाची भुमिका आणि क्षमता साध्य करण्याच्या दिशेनं हा मैलाचा दगड असल्याचं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. तर हि भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतेची आणि नवोन्मेषी चैतन्याची चुणूक असल्याचं धनखड यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

दक्षिण मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सच्या ३०० एकर जागेवर जागतिक दर्जाचं थीम पार्क उभारण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळानं मंजूरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या बैठकीत राज्याच्या तृतीयपंथीविषयक धोरणालाही मंजुरी मिळाली. यापुढं सरकारी कागदपत्रांवर वडिलांबरोबर आईचंही नाव बंधनकारक करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे.

मुंबईत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केएफडब्ल्यूकडून ८५० कोटी अर्थसहाय्य घ्यायला, तसंच एमएमआरडीएच्या प्रकल्पांसाठी २४ हजार कोटीची शासन हमी द्यायलाही मत्रिमंडळानं मंजुरी दिली.

<><><><><>

नवमतदारांसाठी मेरा पहला वोट देश के लिए हे मतदार जागरूकता अभियान सुरू आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असतो. यावेळी पहिल्यांदा मतदान करणार असलेल्या नवमतदारांनी या लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन

आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेते दीपक करंजीकर यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट...दीपक करंजीकर**

**<><><><><>**

निवडणूक रोखे विक्रीची माहिती देण्यासाठी येत्या ३० जूनपर्यंत मुदत मागणारा स्टेट बँक ऑफ इंडियाचा अर्ज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला आहे. निवडणूक रोखेविषयक माहिती उद्या कामकाज बंद होण्याच्या वेळेपर्यंत निवडणूक आयोगाला द्यावी, असे निर्देश सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच सदस्यीय पीठानं दिले आहेत. निवडणूक आयोगानं ही माहिती परवा संध्याकाळी ५ वाजेपर्यंत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, असे निर्देशही न्यायालयानं दिले.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज दुसऱ्या दिवशी मुंबईनं विदर्भावर २६० धावांची आघाडी घेतली. पहिल्या डावात २२४ धावा करणाऱ्या मुंबईनं आज विदर्भाचा पहिला डाव १०५ धावात गुंडाळला. त्यामुळे पहिल्या डावात मुंबईला ११९ धावांची आघाडी मिळाली. मुंबईतर्फे धवल कुलकर्णी, शम्स मुलानी, आणि तनुष कोटियन यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.

आजचा खेळ थांबला तेव्हा मुंबईच्या, दुसऱ्या डावात, दोन बाद १४१ धावा झाल्या होत्या. मुशीर खान ५१, तर अंजिक्य रहाणे ५८ धावांवर खेळत होता.

<><><><><>

युवा मुष्टीयुद्ध विश्वचषक स्पर्धेत भारताच्या संघानं उपविजेते पद पटकावलं आहे. या स्पर्धेत मुलींमधे भारताच्या निकिता चंद, चंचल चौधरी, पार्थिव ग्रेवाल आणि आकांक्षा फलस्वाल यांनी विविध वजनी गटामधे सुवर्ण पदकं पटकावली. तर मुलांमधे ब्रजिश तमतानं सुवर्णपदक पटकावलं.

निकिता चंदला या स्पर्धेतला उत्कृष्ट मुष्टीयोद्ध्याचा किताबही मिळाला. याशिवाय नऊ रौप्य आणि १२ कांस्यपदकासह भारतीय संघानं एकूण २६ पदकं या स्पर्धेत पटकावली.

<><><><><>

स्पेनममध्ये झालेल्या युरोपा चषक २०२४ नौकायन स्पर्धेच्या ILCA 7 प्रकारात भारताच्या विष्णू सरवन यानं काल सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेत १७ गुण मिळवत विष्णू अव्वल ठरला.

विष्णू सरवन हा यावर्षी पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे.

<><><><><>

केंद्रीय क्रिडामंत्री अनुराग ठाकूर उद्या चंदीगडमधे खेळाडूंच्या गुणवत्ता शोध घेणाऱ्या किर्ती या अभिनव उपक्रमाचं उद्धाटन करणार आहेत. हा उपक्रम ९ ते १८ वर्ष गटातल्या खेळाडूंसाठी आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन देशाच्या कानाकोपऱ्यातल्या गुणवान खेळाडूंचा शोध घेण्याचा प्रयत्न याअंतर्गत केला जाणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत ‘सशक्त नारी विकसित भारत’ या कार्यक्रमात महिला लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी एक हजार महिलांना ड्रोन सुपूर्द केले, दीनदयाळ अंत्योदय योजनेतील यशस्वी लखपती दीदी महिलांचा सत्कार केला, तसंच विविध स्वयं सहायता गटांना सुमारे आठ हजार कोटी रुपयांचं कर्ज वितरित केलं.

<><><><><>

मध्य प्रदेशात, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातल्या ड्रोन दिदींनी 102 ड्रोन एकत्र उडवून नवा विक्रम केला. भोपाळमधल्या फांडा इथं नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पल्स रिसर्च सेंटरमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्व ड्रोन दीदींना भोपाळमध्ये ड्रोन उडवण्याचं प्रशिक्षण देण्यात आलं. या ड्रोन चा वापर ड्रोन दीदी शेतीच्या कामात करणार आहेत.

<><><><><>

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा उद्या नंदूरबार जिल्ह्यातून महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. त्यानंतर १३ मार्चला धुळे, मालेगाव, १४ मार्चला नाशिक, १५ मार्चला पालघर, ठाणे असा प्रवास करत ही यात्रा १६ मार्चला मुंबईत दाखल होणार आहे. १७ मार्चला भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप मुंबईतल्या शिवाजी पार्क मैदानावर होणार आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या मॉरिशसच्या दौऱ्यावर आहेत. मॉरिशसच्या राष्ट्रीय दिवसानिमित्त आयोजित खास कार्यक्रमाला राष्ट्रपती मुर्मू प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. मॉरिशस दौऱ्याच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती मुर्मू मॉरिशसचे राष्ट्रपती पृथ्वीराज सिंह रुपन यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानतंर राष्ट्रपती मुर्मू यांनी आयुर्वेद उद्यानाला आणि सर सिवुसागर रामगुलाम बोटॉनिकल उद्यानाला भेट दिली.

//<><><><><>//